**योजनेचे नाव :- आदर्श ग्रामसेवक पुरस्कार**

**<u>योजनेची संक्षिप्त माहिती</u>** :-

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.वैप्रोब.1096/प्र.क्र.3202/49, दि. 10 नोव्हेंबर 1998 अन्वये ग्रामीण भागात शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी यशस्वीपणे करून ग्रामीण भागातील सर्व सामान्य जनतेचे राहणीमान उंचावण्यास व अडचणी सोडविण्यास सर्वोतोपरी सहाय्य ठरणाऱ्या ग्रामसेवकाची आदर्श ग्रामसेवक म्हणून प्रत्येक गटाकडून एक सर्वोत्कृष्ट ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी निवड जिल्हा परिषद स्तरावर करून त्यांचा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. यांचे स्वाक्षरीने प्रशस्ती पत्रक व सन्मान पदक या स्वरूपात पुरस्कार देऊन सत्कार करणेत येतो.

**<u>योजनेचे निकष व अटी शर्ती</u>** :-

शासनाकडील सुचनेप्रमाणे प्रशासकिय व योजनेचे कामकाज मुल्यमापन बाबी नमुन्यातील माहिती व प्रस्ताव ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकारी यांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेमार्फत प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे सादर केला जातो. जिल्हास्तरीय निवड समिती मार्फत निवडीची प्रक्रिया केली जाते.

**<u>योजनेचे फायदे</u>** :-

ग्रामिण भागामध्ये शासनाच्या विविध योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी करून ग्रामिण भागाचा विकास करणेसाठी सर्वतोपरी सहाय्य करणे , ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विविध लोकोपयोगी कामे करणे, प्रत्येक योजना गाव पातळीवर योग्य प्रकारे राबवून गौरवास्पद कामगिरी करणेस व अधिक सक्षमपणे उत्कृष्ठ काम करणेकरिता, तसेच ग्रामसेवक पदाची विहित कर्तव्ये यशस्वीपणे पार पाडणेस प्रोत्साहनात्मक मिळते.